Destop/all files/more sir/letter doc.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८ लेखा विभाग.
क्र.लेखा/भनिनि/३०/कावि/ १८ /२०१७
दिनांक:- १८/१/२०१७

**विषय :- भविष्य निधी कार्यालयाकडील नोटीसबाबत....**
१) काक/३/कावि/१९०/२०१६ दि.३/११/२०१६
२) काक/३/ कावि/२४१/२०१६ दि.२६/१२/२०१६
३) काक/३/ कावि/३/२०१७ दि.०३/१/२०१७

**परिपत्रक,**

मा. रिजनल तथा सुनावणी अधिकारी, पी.एफ. कमिशनर, भविष्य निर्वाह निधी कार्यालय, गोळीबार मैदान पुणे. यांचे बरोबर भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ बाबत दि.१३/१/२०१७ रोजी बैठक झाली. सदर बैठकीमध्ये खालील मुद्दे चर्चेस आले.

माहे जाने.२०११ ते माहे. डिसें.२०१४ पर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या ठेकेदारांकडे काम करीत असलेल्या कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ लागू होत असल्याने, सदर कायद्या अंतर्गत भविष्य निर्वाह निधीची वर्गणी भरणे आवश्यक आहे. यासाठी सदर संस्थेने माहे जाने.२०१७ ते ३१ मार्च २०१७ पर्यंत Provident Fund Amnesty Scheme ( अभय योजना) जाहीर केली आहे. तरी आपले विभागामध्ये कार्यरत असणा-या ठेकेदारांकडून या योजनेचा फायदा घेण्याची सुचना द्यावी.

तसेच जे ठेकेदार सद्यस्थितीत महापालिकेत कार्यरत नाहीत. परंतु त्यांनी सन २०११ ते २०१४ या कालावधीत महापालिकेत कामे केलेली आहेत त्यांचेशी रजिस्टर पत्राद्वारे (RPAD) संपर्क साधून भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ बाबतची पुर्तता करणेसाठी आग्रह धरणेत यावा. व पोष्टाची पोहोच पावती पुढील कार्यवाही साठी जपून ठेवणेत यावी.

तरी वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

मुख्यलेखापाल
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

प्रति,
१) संबधित विभाग